**कार्यालय**
**नगर परिषद, नागभीड**
**ता. नागभीड जिल्हा - चंद्रपुर**

Email ID :- mcnagbhid@gmail.com Ph No. 07179-240170

जा.क्र. /नपना/बांधकाम. वि/२०२५/ २३७२ दिनांक : २९/ १०/२०२५

## -: आदेश :-

**विषय** :- जनहित याचीका क्रंमाक 71/2013 व **Interim Application (Lodgin) No. 29119 of 2025** अंतर्गत मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रस्त्यावरील खडयाच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानगर पालिका / नगर परिषद / नगर पंचायती यांनी समिती गठीत करणेबाबत.

**संदर्भ :-** मा. प्रशासक, नगर परिषद, नागभीड यांचे ठराव क्र. 55 दिनांक :- 28/10/2025 .

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रस्त्यावरील खडयाच्या संदर्भात जनहित याचीका क्रंमाक 71/2013 अन्वये दिनांक - 13/10/2025 रोजी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व महानगर पालिका/नगर परिषद/नगर पंचायती यांनी समिती गठीत करणे आवश्यक आहे. सदर निर्देशाचे अनुषंगाने नागभीड नगर परिषद क्षेत्राकरिता संदर्भीय प्रशासकीय निर्णयानुसार मिळालेल्या मंजुरी अन्वये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | नगर परिषद क्षेत्राकरिता गठीत केलेली समिती यांचे पद | समिती पदनाम |
|---|---|---|
| 1 | मुख्याधिकारी न.प. नागभीड | सदस्य |
| 2 | विद्यमान सचिव जिल्हा विधी सेवा प्राधीकरण चंद्रपूर | सदस्य |
| 3 | प्रशासकीय अधिकारी न.प.नागभीड | सदस्य |
| 4 | नगर अभिंयता न.प.नागभीड | सदस्य |
| 5 | अभिंयता, पा.पु. व मलनिस्सारण | सदस्य |
| 6 | उपअभिंयता सार्व. बांधकाम उप विभाग नागभीड | सदस्य |
| 7 | उपअभिंयता बांधकाम उप विभाग, चिमूर जिल्हा परिषद चंद्रपूर | सदस्य |

वरील प्रमाणे समिती सदस्यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी त्यांचेकडील जनहित याचीका क्रंमाक 71/2013 मधील आदेश **Interim Application (Lodgin) No. 29119 of 2025 (For Intervention)** अन्वये पारीत केलेल्या आदेशानुसार व त्यामधील दिलेल्या सुचनेनुसार नगर परिषद क्षेत्रात रस्त्यावरिल खडयाबाबत प्राप्त होणा-या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी तसेच खडयामुळे व उघडया मॅन्होलमुळे अपघात झाल्यास अपघात ग्रस्त नागरीकांना किंवा त्याच्या कायदेशीर वारसांना नुकसाण भरपाई देणेबाबत कार्यवाही करण्याच्या दृष्टीने समिती सादेस्यांनी वेळोवेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका 71/2013 अन्वये देलेल्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही पार पाडावी व नागभीड नगर परिषद क्षेत्रात रस्त्यावरील खड्यांमुळे जीवित हानी होणार नाही. याकरिता आवश्यकता उपाय योजना करण्यात यावी.

मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद , नागभीड

प्रतिलिपी :-

1) मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, मुंबई यांना ,माहीतीस
2) मा. विभागीय सहआयुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय, नागपूर .
3) मा. जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर .
4) समस्थ समिती सदस्य वरील आदेशानुसार .